Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

# CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648

Issue X Vol. VI , Aug. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143


## Index



| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | The Relation Between The Level Of Job Satisfaction And TypesOf Personality In Higher Secondary School Teachers | Smt. Geeta H. Inginshetty | 1 |
| 2 | Anxiety And Mental Health Of Chronic Patients | Dr. .AnilkumarTengli | 5 |
| 3 | Globalization And Social, Economical Development In India | Mr. Pawar S.S | 10 |
| 4 | Biodiversity Of Zooplanktons And Applications For Development Of Fishery At Mahasangvi Reservoir Tq. PatodaDistBeed (Ms) | rashant V. Patil | 13 |
| 5 | "Comparative Study Of Anxiety Level Of Tribal And Non-Tribal Athletes" | Dr. Sunilkumar | 16 |
| 6 | "Effect of minor games on physical fitness of school going children" | Prof. Sughand Band | 19 |
| 7 | Indian Agriculture Sector Before and After Globalisation - An Analysis | Dr. MarotiTegampure, Dr. Amrita Sahu | 24 |
| 8 | हरभरा पिकाची उत्पादकता : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर | 31 |
| 9 | मोहन राकेश के नाटकों में तात्विक विवेचन | **डॉ. सचिन रमेशराव चोल** | 35 |
| 10 | साहित्य आणि समाज सहसंबंध | डॉ. प्रा. गणेश लहाने | 41 |
| 11 | जागतिकीकरण आणि लोककला | प्रा.डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्रे | 46 |
| 12 | आदिवासी जीवन | स.प्रा.डॉ. राजेश प्रल्हादराव आरदवाड | 56 |
| 13 | भारतातील इंटरनेटवरील व्यापाराचे वाढते महत्त्व | प्रा. सुभाष विनायकराव मोरे | 59 |
| 14 | साहित्याच्या आंतर्विद्याशाखीय अभ्यासाची गरज | डॉ.सुनीता सांगोले | 61 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X, Vol.III , April. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# साहित्याच्या आंतर्विद्याशाखीय अभ्यासाची गरज

**डॉ.सुनीता सांगोले**
दयानंद कला महाविद्यालय,लातूर
-------------(१४)-------------

२१ वे शतक हे जागतिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडविणारे शतक आहे. आपल्या देशाने देखील ' जय विज्ञान जय तंत्रज्ञान ' हे ब्रिदवाक्य घोषित केले आहे. २१ वे शतक हे तंत्रज्ञान संक्रमणाचा कालखंड आहे. यंत्र, तंत्र, शास्त्र, शस्त्र, ज्ञान-विज्ञान या क्षेत्राने नवे रूप धारण केले आहे. एवढेच नव्हे तर इंटरनेटसारख्या प्रसारमाध्यमांद्वारे जगातल्या कुठल्याही प्रदेशामध्ये क्षणार्धात संपर्क साधला जाऊ लागला आहे. जागतिक वातावरणाच्या बदलासाठी समुद्राच्या तळाशी अथवा हिमालयाच्या उंच शिखरावर बैठक घेतली जात आहे. हे आधुनिक तंत्रज्ञानाचे द्योतक आहे. या परिवर्तनीय प्रवाहामध्ये साहित्य कसे अपवाद ठरेल? साहित्याचा आशय - अभिव्यक्तीच्या स्वरुपात बदल होणे गरजेचे आहे. त्यापेक्षा या आधुनिक विज्ञान - तंत्रज्ञानाच्या काळामध्ये विविध अंतर्विद्या शाखांमध्ये साहित्याच्या अभ्यासाची गरज काळाच्या ओघाने अत्यंत आवश्यक आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, वाणिज्य, मानववंशशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिष इ. शाखांचा समावेश आंतर्विद्या शाखांमध्ये होतो. या आंतर्विद्याशाखांचा साहित्याच्या दृष्टीने अभ्यास करणे कसा आवश्यक आहे याचे शाखानिहाय विश्लेषण पुढीलप्रमाणे आपणास करता येईल.

**विज्ञान आणि साहित्य :**

विज्ञान आणि साहित्य या दोहोंचा विचार केला तर दोन्ही संकल्पना परस्पर विरोधी आहेत. आधुनिक काळामध्ये विज्ञानाने वेगाने प्रगती केली आहे. एवढेच नव्हे तर जगातील सर्व क्षेत्रे विज्ञानाने पादाक्रांत केली आहेत. विज्ञानाच्या स्वरूपावर प्रकाश टाकला, तर तो सिद्धांत, निष्कर्ष यांना महत्त्व देते. साहित्याचे स्वरुप पाहिले तर मानवी भावनांच्या विविध वृत्ती-प्रवृत्तींचे प्रतिनिधीत्व करणारे आहे. आज वरील दोन्ही क्षेत्रे परस्पर विरोधी आहेत. परंतु साहित्याचा आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने विचार केला तर जीव-जंतुची उत्पत्ती, त्याचे जीवनचक्र, रसायन-भौतिकशास्त्राचे रासायनिक सिद्धांत, गणितीय प्रमेय इ. संकल्पनांना साहित्यात स्थान देणे आवश्यक आहे. किरण राम नगरकर यांनी सात सक्त त्रेचाळीस किंवा प्रेमाच्या त्रिकोणाची चौथी बाजू असे रूपकात्मक गणितीय स्वरूपाचे शीर्षक देऊन आशयाला परिपक्वता आणण्याचा नगरकर यांच्यासह कांही लेखकांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. विशेषत: महायुद्धानंतरच्या काळात जगातल्या समग्र मानवी जीवनावर यंत्रयुग, विज्ञानयुगाचा बदलत्या मूल्यांचा प्रभाव पडला. या प्रभाव परिणामातून मराठी साहित्यामध्ये गंगाधर गाडगीळांनी 'उन्हाळा' सारख्या नवकथेतून वैज्ञानिक प्रगती मानवी जीवन यावर प्रकाश टाकलेला आहे. याच काळात नवकवितेचे जनक बा.सी. मर्ढेकरांनी पंक्चरलेली रात्र, ओल्या पिपांत मेले मंदिर किंवा नळीतले जग नळीतले वारे, काहो रुसवा रसायनाचा आणि डंका मानवतेचा असे विज्ञानाचे संदर्भ देऊन कवितांमध्ये वैफल्य, विफलता, वैराग्य, नैराश्य, निष्क्रियता इ. मानवी जीवनाच्या मूल्यांवर प्रकाश टाकला आहे. याही पुढे जाऊन विज्ञानाच्या शाखेच्या अभ्यासात साहित्याची अधिक आवश्यकता का आहे ? हे पहावयाचे झाले तर वैज्ञानिक सत्याचा अंतर्भाव साहित्यामध्ये होणे आवश्यक आहे. कुसुमाग्रज यांनी 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेमध्ये पृथ्वी व सूर्य हे दोन्हीही त्रिकालाबाधीत वैज्ञानिक सत्य आहेत. परंतु त्याचा मानवी भावनांचा उत्कृष्टपणे कलात्मक पद्धतीने समन्वय घातला आहे. प्राणीशास्त्राच्या दृष्टीने विचार केला तर गोविंदाग्रजांची पारवा, फुलराणी, औदुंबर, निर्पण वृक्षाच्या भरदुपारी कविता तर आनंद यादव यांच्या माऊमाऊली, नांगरणी इ. साहित्यामध्ये पाळीवप्राणी, पशुपक्षी व वनस्पती इ. चा संदर्भ केवळ कलात्मक रुपाने आलेला पहावयास मिळतो. परंतु साहित्याने याहीपुढे जाऊन आशय व अभिव्यक्तीच्या कक्षा छेदून डायनासूर, एन्डेन्जड स्पेसीज इ. अवाढव्य व सूक्ष्मजीवसृष्टीचे जीवनचक्र, तसेच भौतिक रासायनिक सिद्धांत, प्रमेय, वैज्ञानिक सत्य इ. चा साहित्यामध्ये समावेश होणे आवश्यक आहे. यामुळे साहित्याच्या स्वरुपात आमूलाग्र बदल होऊन साहित्य विश्वाला नवी दृष्टी येईल. तसेच वैज्ञानिक सत्याचा व ज्ञानाचा परिचय सर्वसामान्य वाचकांना अगदी सहज मनोरंजन पद्धतीने होईल. जे की वाचकांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यास मदत

मानसशास्त्रात केला जातो. सिग्मन फ्राईडने मानवी मनाचा अभ्यास करताना प्रकट मन व अप्रकट मन असे मनाचे दोन प्रकार सांगून अप्रकट मनामध्ये अतृप्त, दबलेल्या भावनांची धुसमट चालू असते. अशा मानवी मनाचे चित्रण साहित्यात केले आहे. विशेषतः इंग्रजी साहित्यातील ' संज्ञाप्रवाह ' या संकल्पनेच्या धर्तीवर इ.स. १९०७ नंतर मर्ढेकर (रात्रीचा दिवस, तांबडी माती), शरदचंद्र मुक्तीबोध (शीप्रा, सरहद्द) चित्र्यम खानविलकर (चाणी), पु.शी. रेंगे (रात्रकाळी, घागरकाळी, सावित्री, अजगर), महेश एल. कुंचलवार जयवंत दळवी आणि विजय तेंडूलकर आदींनी मराठी साहित्य निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे. या साहित्य प्रकारात असे अभिव्यक्ती, नवप्रयोगशिलता, संज्ञा प्रवाह, दुर्बोधता इ. पैलूतून नवसाहित्य निर्माण झाले. नवसाहित्याच्या निर्मितीमागची मूळ प्रेरणा मानसशास्त्र हीच होती. मानसशास्त्राच्या विविध अंगाने साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल इ. विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करता येतो. साहित्यामध्ये रंजकतेबरोबर जीवनज्ञान, जीवनाची उपयुक्त मूल्ये इ. मूल्यांबरोबर तंत्रज्ञान, वैज्ञानिक शाखीय ज्ञान, खगोलशास्त्रीय ज्ञान इ. चा बदलत्या काळाबरोबर साहित्यात समावेश होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जागतिकीकरणाच्या बदलत्या मूल्य व परिस्थितीनुसार साहित्याच्या क्षेत्रात किंवा साहित्याचा परिघ वृद्धींगत करण्यासाठी इतर आंतर्विद्याशाखांचा अभ्यास करणे काळाची गरज आहे.

# Current Global Reviewer


ISSN 2319-8648

Peer Reviewed

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in